प्रेस नोट दिनांकः— ०६/०७/२०१९

यातील आरोपीत इसमाने फिर्यादीच्या ओळखीच्या व्यक्तीचे निष्कासित केलेले अनधिकृत बांधकाम पुन्हा करण्याकरीता लोकसेवकाच्या वतीने रुपये १,००,०००/— रक्कमेची लाचेची मागणी करुन ते स्विकारण्याचे मान्य केले म्हणुन मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन गुन्हा दाखल.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा दाखल दिनांक | ०६/०७/२०१९ रोजी १७.२० वा. |
| गुन्हा नोंद क्र. | २३/२०१९ |
| कलम | ७ (अ) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ ( सुधारणा—२०१८) |
| आरोपीचे नांव | भोमराम भवरलाल माली (पप्पु मारवाडी ) ( खाजगी इसम ) |
| आरोपी अटक | नाही |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. १,००,०००/— |
| स्विकारलेलेली लाचेची रक्कम | नाही |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी यांनी त्यांच्या ओळखीच्या व्यक्तीच्या बैठया घराचे अनधिकृतपणे केलेले दुरुस्तीचे काम बीएमसी/पी नॉर्थ वॉर्ड कडुन निष्कासित केले होते. यातील आरोपीताने बीएमसी/नॉर्थ वॉर्ड कडुन निष्कासित केलेले बांधकाम पुन्हा करण्याकरीता तेथील लोकसेवकाच्या वतीने फिर्यादीकडे रुपये १,००,०००/— रक्कमेच्या लाचेची मागणी केली.<br><br>फिर्यादी यांची लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग या कार्यालयात दिलेल्या तक्रारीवरुन पडताळणी करण्यात आली. पडताळणी सापळा कारवाई दरम्यान आरोपीतांने फिर्यादीकडे रु. १,००,०००/— रक्कमेच्या लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे कबुल केले म्हणुन गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाकडे संपर्क साधावा.

संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई— ३०.
संकेतस्थळ — acbmaharashtra.gov.in
ईमेल : (1) acbwebmail@mahapolice.gov.in, (2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन - www.acbmaharashtra.net
टोल फ्री क्र. १०६४
दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,
व्हॉट्स ॲप क्रमांक —९९३०९९७७००
व्हॉटस्अप क्र. ९९३०९९७७००

( वंदना नारकर)
अपर पोलीस उप आयुक्त,
ला.प्र.वि., मुंबई विभाग, मुंबई.

Addl. Dy. Commissioner of Police, Anti Corruption Bureau
Mumbai Unit

Scanned by CamScanner